# राप महामंडळाचे आगाऊ आरक्षण मोबाईल ॲप

राप महामंडळ प्रवाशांना पुरवित असलेल्या आरक्षण योजनेमध्ये, सध्या राप महामंडळाच्या आरक्षण खिडकीद्वारे, संकेतस्थळाद्वारे, इंटरनेटद्वारे, खाजगी तसेच इंद्रधनु आरक्षण परवानाधारकांद्वारे आगाऊ आरक्षण तिकीट विक्री सुरु असुन याव्यतिरिक्त ऑनलाईन आरक्षणाची सुविधा आता राप महामंडळाच्या अधिकृत मोबाईल ॲपवरही उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

मोबाईल ॲपच्या वापराकरीता “Android” मोबाईलमधील “Google Play Store” वरुन “MSRTC Mobile Reservation App” डाऊनलोड केल्यानंतर प्रवाशांने नोंदणी करुन लॉग-इन करणे गरजेचे आहे. राप महामंडळामार्फत तिकीटाच्या आगाऊ आरक्षणासाठी नेट बँकींग, क्रेडीट-कार्ड/डेबिट-कार्डद्वारे ऑनलाईन पेमेंट ची सुविधा मोबाईल ॲपद्वारेही उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. “MSRTC Mobile Reservation” या ॲपद्वारे प्रवाशांना त्यांच्या सोयीचा आसन क्रमांक, बससेवाप्रकार, बसफेरीची वेळ, प्रवाशाचे चढण्याचे/उतरण्याचे ठिकाण इ. बाबी निवडता येतील.